# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा.
ता. कळमेश्वर, जि. नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

डॉ. लिलाधर डी. खरपुरिये — रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी

डॉ. एम. व्ही. कोल्हे — प्राचार्य

## 2018—2019

## आंतरराष्ट्रीय योग दिवस

## २१ जुन २०१८

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयत योगासने व प्राणायम घेण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे, डॉ. अश्विनी खापरे, डॉ. प्रमोद वडते, प्रा. विनोद भालेराव, ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, डॉ. लिलाधर खरपुरिये, प्रा. सचिन काळे तसेच कार्यालयाचे मुख्य लिपिक संजय गणोरकर, शुभम वाघ, चैतन्य सुपले,ग्रंथालय परिचर अजय अंजनकर आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी प्रदीप बगडे, श्रीमती रजनी गणोरकर व प्रकाश कोकोडे उपस्थित होते.

योग वर्गात सर्वप्रथम योग प्रार्थना म्हणून शरीर संचलनाने सुरूवात झाली. नंतर विविध आसने घेण्यात आली. त्यात प्रामुख्याने ताडासन, वज्रासन, त्रिकोणासन, वृक्षासन, पद्मासन व ओंकार घेण्यात आला. त्यानंतर प्राणायम (अनुलोम विलोम) करून शिथिलासन घेण्यात आले.

क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. श्रीमती अल्का थोडगे यांनी प्रास्ताविक केले व सर्वांकडून योगासने करवून घेतली. याप्रसंगी डॉ. खापरे यांनी आपल्या मार्गदर्शनात चांगले मन व निरोगी जीवन जगण्याकरिता योगाचे महत्व अधोरेखीत केले

शेवटी राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ. खरपुरिये यांनी सर्वांचे आभार मानले व योग दिवस संपन्न झाला असे घोषित केले.





## सत्र १ जुलै २०१८

## नामांकन व स्वयंसेवक निवड प्रक्रिया

## वृक्षारोपण

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा येथे रा. से. यो. च्या वतीने दि. ०१ जुलै, २०१८ ते ३१ जुलै २०१८ या दरम्यान महाविद्यालयाच्या परीसरात वृक्षरोपण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी याप्रसंगी प्रथम वृक्षरोपण करून कार्यक्रमाची सुरूवात केली. महाविद्यालयाच्या जेष्ठ प्राध्यपिका डॉ. आश्विनी खापरे, डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजीत जाचक, प्रा. विनोद भालेराव डॅा. धनंजय देवते, डॅा. अल्का थोडगे, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री संजयराव गणोरकर, श्री अजयराव अंजनकर, श्रीमती रजनी गणोरकर, श्री प्रदिप बगडे, श्री प्रकाश कोकोडे, श्री शुभम वाघ, श्री चेतन सुपले यांनी प्रत्येकी एका वृक्षाचे रोपण केले. यावेळी महाविद्यालयातील रा. से. यो. चे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या परिसरात एकूण ६५ कडुनिंबाच्या झाडाचे रोपण करण्यात आले. या कार्यक्रमात रा. से. यो. स्वयंसेवकांनी मोठया उत्साहाने भाग घेतला. शिवाय आम्ही वृक्षलागवडीसोबतच वृक्षाचे संगोपण व संरक्षण सुद्धा करू अशी शपथ घेतली. रोपटयाचे वृक्षात रूपांतर होईपर्यंत त्याचे रक्षण करू, तसेच वृक्षरोपणाविषयी समाजात जनजागृती निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात येईल असे वचन दिले. कर्मचारी व रा. से. यो. स्वयंसेवकांना प्रत्येकी एक वृक्ष देवून त्यांच्या संगोपणाची जबाबदारी देण्यात आली. सरते शेवटी रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. एल. डी. खरपुरीये यांनी सर्वांचे आभार मानले. व स्वयंसेवकांना बिस्किट देवून कार्यक्रमाची सांगता झाली.







## बॅरि. वानखेडे महाविद्यालयात वृक्षारोपण



**मोहपा** : येथील बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. परिसरात कडुनिंबाची ६५ रोपटी लावण्यात आली. या वृक्षलागवड मोहिमेत महाविद्यालयातील डॉ. खापरे, डॉ. वडते, डॉ. जाचक, प्रा. विनोद भालेराव, डॉ. देवते, डॉ. खरपुरिये, डॉ. थोडगे, संजय गणोरकर, हरीश अंजनकर, प्रदीप बगडे, प्रकाश कोकोडे, रजनी गणोरकर, शुभम वाघ, चेतन सुपले सहभागी झाले होते. याप्रसंगी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथ घेतली.

## शैक्षणिक सत्रातील रा.से.यो.उपक्रमांचा उद्‌घाटन सोहळा

मंगळवार दि. १ ऑगस्ट २०१८ ला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत शैक्षणिक सत्र २०१८-२०१९ मधील विविध उपक्रमांचा शुभारंभ प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला रा.से.यो स्वयंसेवकांनी रा.से.यो गीत सादर केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपूरीये यांनी मागील सत्रातील संकल्प व अंमलबजावणी या विषयी तसेच चालू शैक्षणिक सत्रात नियोजित विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही.कोल्हे यांनी अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयीन युवकात राष्ट्रसंतांचे विचार रूजविण्याचे महत्वाचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत होत आहे. नवराष्ट्र निर्मितीच्या या चळवळीत युवक युवतींनी सक्रीय योगदान देण्याची गरज आहे. तसेच देशात श्रमसंस्काराचा विचार खऱ्या अर्थाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी रूजविला. नागपूर विद्यापीठात राष्ट्रसंतांचे व संत गाडगेबाबांचे विचार पुढे नेण्याचे कार्य सन १९७१ पासून राष्ट्रीय सेवा योजनेव्दारे होत आहे. श्रमसंस्कार, ग्रामस्वच्छता, शिस्त, ग्रामीण नेतृत्व गुणांचा विकास हीच राष्ट्रीय सेवा योजनेची वैशिष्टये आहे असे ते म्हणाले. डॉ. प्रमोद वडते यांनी विद्यापीठामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवावे असे आव्हान केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.ए.ए.खापरे, डॉ.ए.आर जाचक, प्रा.विनोद भालेराव, डॉ.ए.ए.थोडगे व शिक्षकेत्तर

कर्मचारी श्री.संजय गणोरकर उपस्थित होते. उद्घाटन सोहळयाचे संचालन प्रा. सचिन काळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. सुविधा गहूकर यांनी मानले.

## स्वच्छता पंधरवाडा

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा येथे दि. ०१ ते १५ ऑगस्ट २०१८ या दरम्यान स्वच्छता पंधरवाडा साजरा करण्यात आला. दि. ०१ ऑगस्ट ला स्वच्छतेवर मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. राजू श्रीरामे, जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम ता. नरखेड जि. नागपूर हे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनीय भाषणात स्वच्छतेचे महत्व पटवून देत असताना १२५ कोटी देशवासीयांनी एक एक पाऊल पुढे टाकले तर १२५ कोटी पाऊले पुढे येतील व पाहता पाहता संपूर्ण देश स्वच्छ होईल. पण हे करीत असतांना टप्प्या-टप्प्याने हे कार्य करायला पाहिजे. म्हणून सुरूवात आपल्या घरापासून करा, नंतर गाव, शहर, राज्य, व देश स्वच्छ होईल असे विचार विशद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही कोल्हे यांनी प्रत्येकाने जीवनात स्वच्छतेसाठी खारीचा वाटा उचलल्यास गाव, राज्य, व देश स्वच्छ होण्यास वेळ लागणार नाही, असे विचार मांडले. याकरीता समाजात जागृती करण्याची गरज आहे. ही जागृतता राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या माध्यमातून प्रभावीपणे यशस्वी होवू शकते. म्हणून राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या स्वयंसेवकांनी याकरिता तत्पर असायला पाहीजे, असे प्रतिपादन केले.

तसेच दि. ०२ ते ५ ऑगस्ट २०१८ दरम्यान महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. यात परिसरात उगवलेल्या गाजर गवत, काटेरी झुडपे व काडीकचरा जमा करून त्यांना एका खडयात पुरण्यात आला. तसेच महाविद्यालयातील शौचालय स्वच्छ केले. या परिसर स्वच्छता मोहिमेत सर्वच रा. से. यो. स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शेवटी डॉ. एल. डी. खरपुरिये, रा. से. यो.

कार्यक्रम अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानले व विद्यार्थ्यांना नाश्ता-चहा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.







## वानखेडे महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा

मोहपा : येथील बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे स्वच्छता पंधरवडा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मारोती कोल्हे होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून देवग्राम येथील जीवन विकास महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राजू श्रीरामे उपस्थित होते. सर्जनशील व सृजनशील समाज घडविण्यासाठी चांगल्या विचारांच्या तरुणांची गरज आहे. राष्ट्रीय सेवायोजनेच्या माध्यमातून तरुणांना घडविण्याचे कार्य निरंतर होत आहे. महाविद्यालयीन तरुणांनी वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेची सुरुवात स्वत:पासून केल्यास नवीन समाज निर्मितीचे देशाचे स्वप्न पूर्ण होईल, असे मत प्रा. डॉ. राजू श्रीरामे यांनी व्यक्त केले. प्राचार्य कोल्हे यांनी आपल्या भाषणात गाव, राज्य व देश स्वच्छ होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने स्वच्छ भारत अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. याप्रसंगी डॉ. प्रमोद वडले, डॉ. अजित जाचक, डॉ. धनंजय देवले, डॉ. अलका थोडगे, प्रा. सचिन काळे, प्रा. सुविधा गहूकर तसेच संजय गणोरकर, शुभम वाघ, चेतन सुपले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. लीलाधर खरपुरिये यांनी केले. संचालन प्रा. विनोद भालेराव यांनी केले. अजय अंजनकर, रजनी गणोरकर, प्रदीप वगडे, प्रकाश कोकोडे आदींनी सहकार्य केले.



## मोहपा येथे 'स्वच्छते'वर मार्गदर्शन

**मोहपा**

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात नुकताच राष्ट्रीय सेवा योजना पथकातर्फे 'स्वच्छता' या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. मारुती कोल्हे तर प्रमुख पाहुणे म्हणून देवग्राम जीवनविकास महाविद्यालयाचे प्रा. राजू श्रीरामे उपस्थित होते. सृजनशील समाज घडविण्यासाठी चांगल्या विचारांच्या युवकांची गरज आहे. रासेयोच्या माध्यमातून युवकांना घडविण्याचे कार्य होत आहे. युवकांनी स्वच्छतेची सुरुवात स्वत:पासून करावी. नवीन समाजनिर्मितीचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन प्रा. श्रीरामे यांनी केले. प्रत्येकाने जीवनात स्वच्छतेसाठी खारीचा वाटा उचलल्यास गाव, राज्य व देश स्वच्छ होण्यास वेळ लागणार नाही, असे डॉ. कोल्हे म्हणाले. याप्रसंगी डॉ. प्रमोद वडले, डॉ. अजित जाचक, डॉ. धनंजय देवले, डॉ. अलका थोडगे, प्रा. सुविधा गहूकर, संजय गणोरकर, शुभम वाघ, चेतन सुपले उपस्थित होते. संचालन प्रा. विनोद भालेराव यांनी, तर प्रास्ताविक डॉ. लीलाधर खरपुरिये यांनी केले. आभार प्रा. सचिन काळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी अजय अंजनकर, रजनी गणोरकर, प्रदीप वगडे, प्रकाश कोकोडे यांनी सहकार्य केले.

## आठवडी शिबिर:-

## १४ ऑगस्ट २०१८

मंगळवार दि. १४ ऑगस्ट २०१८ रा.से.यो पथकाव्दारे महाविद्यालय परिसरात सकाळी ८.०० ते ११.०० दरम्यान स्वयंसेवकांनी परिसर साफसफाई मोहिम राबविली. तसेच रस्त्याच्या बाजूला वाढलेल्या गाजर गवत निर्मूलन करण्यात आले. स्वच्छता मोहिम संपल्यानंतर सर्वांना चहा व अल्पोपहार देण्यात आला. या अभियानात स्वयंसेवकाची उपस्थिती वाखानण्याजोगी होती.

 

## स्वातंत्र दिन
## १५ ऑगस्ट २०१८

दि.१५ ऑगस्ट ला महाविद्यालयाचे ध्वजारोहण मोहपा शिक्षण मंडळाचे सदस्य् मा.तेजराजजी नाखले यांच्या हस्ते सकाळी ७.३० वाजता करण्यात आले. याप्रसंगी मोहपा शिक्षण मंडळाचे सदस्य भाऊरावजी सुपले, प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्हे, रेखडे विद्यालय पिपळा(किनखेडे)चे माजी मुख्याध्यापक श्री.वा.पां. देवते, रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर डी.खरपुरिये, डॉ. अश्विनी खापरे, डॉ.संजय ठवळे, .डॉ.प्रमोद वडते, डॉ.अजित जाचक, प्रा.विनोद भालेराव, डॉ.धनंजय देवते व महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.संजय गणोरकर व इतर प्रामुख्याने उपस्थित होते आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना बिस्किटचे वाटप करण्यात आले. या स्वातंत्र दिनाच्या कार्यक्रमाकरिता रा.से.यो.स्वयंसेवक व कार्यक्रम आधिकारींनी अथक प्रयत्न केले.

 

## शिक्षक दिन
## ५ सप्टेंबर २०१८

दि. ५ सप्टेंबर २०१८ ला महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्ह होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे डॉ.अश्विनी ए. खापरे, डॉ.संजय ठवळे, डॉ.प्रमोद वडते, डॉ.अजित जाचक प्रा.विनोद भालेराव, डॉ.धनंजय देवते, डॉ.अल्का थोडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामधून रा.से.यो. कार्यक्रम आधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी शिक्षकदिनाचे महत्व विशद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एम.व्ही. कोल्हे यांनी बदलत्या काळात शिक्षकांसमोरील आव्हाने या विषयावर आपले विचार व्यक्त केले. प्रा.कु. सुविधा गहुकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स्वयंसेवीका कु. किरण बोडखे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता रोशन मानमोडे,, माधुरी राऊत, शितल होटे, इत्यादी स्वयंसेवक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमानंतर स्वयंसेवकांना केळी, अल्पोहार आणि चहा देण्यात आला.





## आठवडी शिबिर
## रविवार दि. ०९ सप्टेंबर २०१८

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयाचा परिसर व रस्ता साफ केला गेला. त्यामध्ये गाजर गवत निर्मूलन, प्लास्टीक कचरा एकत्र करणे, इत्यादी करिता मोहिम राबविण्यात आली. यामध्ये ८० स्वयंसेविका व १२ स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला होता. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

डॉ. एल.डी. खरपुरिये सोबत महाविद्यालयीन शिक्षकांनी सुध्दा या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग घेतला.

नंतर स्वयंसेवकांना बिस्किट देण्यात आले.




## दिग्विजय दिवस

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात दि. ११ सप्टेंबर दिग्विजय दिवस म्हणून साजरा करण्यात आला. ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो येथे झालेल्या सर्व धर्मपरिषदेतील स्वामी विवेकानंदाच्या ऐतिहासिक भाषणाला दि. ११ सप्टेंबर २०१८ रोजी १२५ वर्ष पूर्ण झाालेली आहे त्यामुळे शासनाने हा दिवस शतकोत्तर रौप्य महोत्सव (१२५ वर्षे) म्हणून साजरा करण्याचे ठरविले.

या निमित्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली दिग्विजय दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. संजय ठवळे आणि दैनिक लोकमत चे स्थानिक प्रतिनिधी श्री. संजय गणोरकर हे प्रमुख अतिथी होते. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी स्वामी विवेकानंदाने १२५ वर्षापुर्वी शिकागोत केलेल्या भाषणाचे (मराठी अनुवाद) वाचन संजय गणोरकर यांनी केले. आणि विद्यार्थ्यांन कडून वाचन करवून घेतले. कार्यक्रमाला प्रा. कु. सुविघा गहूकर, अजय अंजनकर, शुभम वाघ, चैतन्य सुपले, रजनी गणोरकर, व प्रदिप बगडे प्रामुख्याने उपस्थित होते.प्रा. सचिन काळे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर कु. पल्लवी चिमोटे हिने आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी

उपस्थित होते. नंतर विद्यार्थ्यांत बिस्किट वाटप करण्यात आले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.





## स्वामी विवेकानंद यांच्या भाषणाचे वाचन



## वानखेडे महाविद्यालयात दिग्विजय दिवस साजरा








## बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात दिग्विजयदिन

## राष्ट्रीय सेवा योजना दिन
## दि. २४ सप्टेंबर २०१८

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे दि. २४ सप्टेंबर २०१८ ला राष्ट्रीय सेवा योजना दिन व बॅरि शेषराव वानखेडे कृतज्ञता सोहळा साजरा करण्यात आला. या दिनानिमित्य कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे होते. तर कार्यक्रमाचे उदघाटक आ. बाबासाहेब लांडे, सचिव मोहपा शिक्षण मंडळ मोहपा हे होते. तर प्रमुख पाहुने म्हणून श्री. अरविंद धवड, संचालक मोहपा शिक्षण मंडळ मोहपा व श्री तेजराव नाखले, संचालक मोहपा शिक्षण मंडळ मोहपा हे उपस्थित होते. बाबासाहेबांनी बॅरि. साहेबांचा जिवन प्रवास उलघडून दाखविला तसेच रा.से. यो. च्या माध्यमातून बॅरि. साहेबासारखे दुसरे नेतृत्व तयार होवू शकते असे विचार विशद केले. तर श्री अरविंद धवड यांनी बॅरि. साहेबांचे शैक्षणिक कार्यावर आपले विचार मांडले श्री. तेजराजजी नाखले यांनी सुदधा मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. ए. ए. खापरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासात रा. से. यो. ची काय भूमिका होती याचा इतिहास उलगडून दाखविला. डॉ. प्रमोद वडते यांनी त्यांच्या काळातील विशेष शिबिरातील अनुभव कथन केले. त्यावेळेस प्रा. भालेराव यांनी संत गाडगे बाबा यांचे स्वच्छतेविषयी असलेली धडपड, गाडगेबाबांनी व बॅरि. साहेबांनी समाजाला दिलेला संदेश याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरीये यांनी केले. प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना व उद्दिष्ये यांचा वर्तमान सामाजिक प्रश्नांशी सबंध जोडून रा. से. यो. स्वयंसेवक या संदर्भात समाजात जागृती निर्माण करू शकतात. याकरीता स्वयंसेवकांनी मोठया हुरहुरीने कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हायला पाहीजे. असे विचार प्रगट केले. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा.कु. सुविधा गहुकर यांनी केले तर आभर प्रदर्शन कु. भाग्यश्री सयाम हिने केले. कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचा-यानी प्रयत्न केले.





## आठवडी शिबिर

## रविवार दि. ७ ऑक्टोबर २०१८

रासेयो पथकाव्दारे ७ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ८.०० ते ११.०० वाजेपर्यंत महाविद्यालय स्वच्छता आठवडी शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयात ८२ स्वयं सेवकांनी साफसफाईचे काम केले. सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वयंसेवकांना एकत्र करून गीतगायनानीं शिबीराची सांगता झाली.









## महात्मा गांधी जयंती व जागतिक अहिंसा दिवस
## दि. २ ऑक्टोंबर २०१८

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे गांधी जयंती निमित्ताने तसेच जागतिक अहिंसा दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. एम. व्हि. कोल्हे होते. तर प्रमुख पाहुने डॉ. प्रकाश पवार, अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय, भारसिंगी हे होते. यांनी महात्मा गांधीजीच्या सत्य, अहिंसा या गुणांची विद्यार्थांना विस्तृत माहिती दिली. रा. से.यो. स्वयंसेवकांनी नेहमी प्रामाणिक राहून व कठोर परिश्रम करून यश संपादन करयला पाहिजे असे विचार विशद केले.

या कार्यक्रमात महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग घेतला. शेवटी रा. से. यो. स्वयंसेवकांत बिस्किटाचे वाटप करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या राष्ट्रवंदनेने या अभियानाची सांगता करण्यात आली.




## जादूटोणा विरोधी कायदा व वैज्ञानीक दृष्टीकोन

दि. ११ ऑक्टोबर २०१८ ला महाविद्यालयात जादूटोणा विरोधी कायदा व वैज्ञानीक दृष्टीकोन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्हि. कोल्हे होते. याप्रसंगी डॉ. ए. ए. खापरे डॉ. पी. ए. वडते., डॉ. अजित जाचक, डॉ. विनोद भालेराव., डॉ. धनंजय देवते., डॉ. अल्का थोडगे व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री संजय गणोरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. कोल्हे यांनी जादुटोणा हया समाजाला लागलेली किड असून अंधश्रध्दा

पसरविण्यास कारणीभूत आहे. म्हणून जादुटोणा विरोधी कायद्याची आवश्यकता आहे. असे विचार व्यक्त केले तर या प्रसंगी डॉ. खापरे व प्राध्यापकांनी आपले विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. लिलाधर खरपूरिये रा.से. यो. कार्यक्रम अधिकारी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सचिन काळे यांनी व कु. किर्ती कौरती हिने आभार मानले.



## स्वच्छता पंधरवाडा

आज दि. १३/१०/२०१८ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॅा. एम.व्ही. कोल्हे हयांच्या अध्यक्षतेखाली व डॅा. अश्वीनी खापरे प्रमुख उपस्थितीत, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी आणि विद्यार्थी हयांनी कार्यालयीन स्वच्छता पंधरवाडयाच्या सुरवातीच्या दिवशी स्वयंस्फूर्ते स्वच्छता मोहिम राबविली. त्यात प्रामुख्याने कार्यालयीन परिसर व व्हरांडा स्वच्छता व शैक्षणिकवर्ग खोल्या स्वच्छता माहिमहयावर भर दिला व सर्वांनी संकल्प केला कि येणाऱ्या पुढील १५ दिवस निरंतर स्वच्छता मोमिम राबवून कार्यालय व महाविद्यालय परिसर स्वच्छ ठेवून ‘स्वच्छता ही सेवा’ हया संकल्पनेवर संपूर्ण पंधरवाडा ही सेवा राबवनू असो निक्चय केला.

संपूर्ण पंधरवाडयामध्ये स्वच्छता  मोहिमे अंतर्गत हागणदारीमुक्त  गाव ही जनजागृती मोहिम, पाणीपुरवठा करणारी यंत्रणा स्वच्छ आहे कि नाही हयाची शहानिशा, कार्यालयीन वस्तु निटनेटक्या जागेवर स्वच्छ व सुयोग्य मांडणी, महाविद्यालयाच्या प्रवेश मार्ग स्वच्छ व त्याची आखणी, महाविद्यालयाचे गार्डन व हिरवळ समितीव्दारे त्याची देखभाल असे विविध कामे  कर्मचारी वर्गाकडून व स्वच्छेने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांकडून करवून घेण्यात आली.

संपूर्ण पंधरवाडयात  महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.व्ही. कोल्हे, डॉ. अश्वीनी खापरे, डॉ. संजय ठवळे, डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजित जाचक, डॉ. विनोद भालेराव, डॉ. धनंजय देवते, डॉ. लिलाधर खरपूरिये, डॉ. अल्का थोडगे, श्री. सचिन काळे,व कु सुविधा गहूकर हयांचे मोलाचे सहाकर्य मिळाले.

त्या  सोबतच  कार्यलयीन अधिकारी श्री. संजय गणोरकर कर्मचारी श्री. शुभम वाघ, श्री. चेतन सुपले, श्री. हरिष अंजनकर व श्री. प्रदिप बागडे, श्री. प्रकाश कोकोडे व सौ. रजनी गणोरकर हयांनी अथक परिश्रम घेवून पंधरवाडा संपन्न करण्यात आला .




**संविधान दिन**

**दि. २६  नोव्हेंबर २०१८**

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी  संविधान दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

भारताच्या संविधानाबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी. संविधानामुळे भारतात शासकीय, न्यायीक व्यवस्था निर्माण झाल्या, अशा संविधानाची ओळख सर्वांना व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग व रा. से.यो. यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले. कोणत्याही देशाचे संविधान त्या देशाच्या सामाजिक रूढी, परंपरा व प्रथा आदींची एक चौकट असते. या चौकटीतून देशाच्या एकूण परिस्थितीचे प्रतिबिंब उमटते, असे मत प्राचार्य डॉ. कोल्हे यांनी यावेळी व्यक्त केले.

राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अश्विनी खापरे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन विद्यार्थ्यांकडून करवून घेतल्यानंतर या उद्देशपत्रिकेतील मुलभूत तत्वांचा अर्थ स्पष्ट केला. २६ नोव्हेंबर,१९४९ रोजी भारताचे संविधान जनतेला अर्पण करण्यात आले. जगातील सर्वांत मोठी आणि बळकट लोकशाही व्यवस्था भारतात आहे. म्हणून प्रत्येक सुजाण नागरिकाने भारताच्या संविधानाची किमान उद्देशिकातरी समजून घेणे गरजेचे आहे, असे विचार त्यांनी व्यक्त केले. संविधान निर्मितीचा इतिहास उलगडत संविधान दिनाचे औचित्य रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. खरपुरिये यांनी विशद केले.

प्रा. सचिन काळे यांनी कार्यक्रमाचे संचालन व आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची भरगच्च उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. प्रमोद वडते, डॉ. अल्का थोडगे, प्रा.सुविधा गहुकर यांचेसह सर्व अधिव्याख्याता आणि संजय गणोरकर, रजनी अकर्ते, अजय अंजनकर, शुभम वाघ, चैतन्य सुपलेआदी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.





## राष्ट्रीय युवा दिन
## दि. १२ जानेवारी २०१९

महाविद्यालयात दि. १२ जानेवारी ला स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिन राष्ट्रीय युवादिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्हे होते. तर प्रमुख पाहुण्या प्रा.डॉ.अश्विनी खापरे हया होत्या. प्रमुख वक्ते डॉ.अजित जाचक व प्रा.विनोद भालेराव होते. सर्वच पाहुण्यांनी स्वामी विवेकानंदाच्या विचारांची जगाला गरज आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एम. व्हि. कोल्हे यांनी विवेकानंदांचे हिंदु संस्कृति व मानवतेविषयी विचार यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी केले. याप्रसंगी प्रा.डॉ.प्रमोद वडते, डॉ.अलका थोडगे, प्रा.सुविधा गहूकर व शिक्षेकेतर कर्मचारी श्री.संजय गणोरकर, हरिश अंजनकर, प्रदिप बगडे, प्रकाश कोकोडे, रजनी गणोरकर, शुभम वाघ, चेतन सुपले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. सचिन काळे यांनी केले. तर आभार डॉ. धनंजय देवते यांनी मानले. या कार्यक्रमाला बहुसंख्या विद्यार्थी उपस्थित होते.




## हत्तीरोग' दुरिकरण मोहिम
## दि. १६/०१/२०१९

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र मोहपा यांच्या संयुक्त विद्यमाने 'हत्तीरोग' दुरिकरण मोहिम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र मोहपा चे अधिकारी मा. पवार साहेब यांनी हत्तीरोगाचा प्रसार कसा होतो. या संदर्भात मार्गदर्शन केले. आणि उपाय योजनाही सांगितल्या व्यासपीठावर विराजमान झालेले मा. गोमासे

साहेब, प्राथमिक आरोग्य केंद्र मोहपा. यांनी महाविद्यालयीन विद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या समाजातून कसा पळवून लावता येईल. त्यासाठी हत्तीरोग निर्मुलनाच्या गोळया प्रत्यकाने घेतल्या पाहिजे, अशी जनजागृती मोहिम विद्यार्थ्यांनी राबविली पाहिजे कार्यक्रमाचे  अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. एम. व्ही. कोल्हे. म्हणाले 'मानवी आयुष्य तंदुरूस्त घालवायचे असेल तर  प्रत्येकाने आपली प्रतिकार शक्ती वाढविली पाहीजे' असे कळकळीचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाला प्राथमिक आरोग्य केंद्र मोहपा चे सहकारी श्री. देहारे, भोपे, टाले, नावाडे, आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. विनोद भालेराव यांनी मानले.





## लघुचित्रपट स्पर्धा

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंती निमीत्त महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतीक  विकास महामंडळ मर्या. गोरेगाव (पू.) यांच्या मार्फत  आयोजीत, महात्मा गांधीजी यांच्या जीवनावर आधारित लघुचित्रपट स्पर्धा २०१८-१९ चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या १५० व्या जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या **Short Films Competition** बाबत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अवगत करण्याकरिता महाविद्याल्याच्या प्रदर्शनी भागावर बॅनर लावण्यात आले. या बॅनरच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना व विद्यार्थ्यांना या स्पर्धेविषयी माहिती व्हावी, या करिता  प्रयत्न  करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्याना प्रत्यक्ष भेटून व चर्चेच्या माध्यमातून सुध्दा त्यांना प्रेरित करण्यात आले.





**आठवडी शिबिर**

**रविवार  दि. २० जानेवारी २०१९**

रविवार दि. २० जानेवरी २०१९ ला मोहपा नगर परिषद येथील गावातील मुख्य रस्ते व आजुबाजूचा परिसर गाजर गवताने वेढलेला होता. प्रजासत्ताक दिन या ठिकाणी उत्साहात साजरा होत असतो. मोहपा येथील सर्व शाळा प्रजासत्ता दिनानिमित्त येथे एकत्र सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करतात. रा.से.यो. स्वयंसेवकांनी हा संपूर्ण परिसर  साफ केले. नगर परिषदेचे शिक्षक सभापती नगरसेवक यांनी रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांचे गोडकौतुक केले. त्यानंतर चहा व बिस्किटं देण्यात आले.





**प्रजासत्ताक  दिन**

**दि. २६  जानेवारी २०१९**

दि. २६ जानेवारी २०१९ ला मोहपा शिक्षण मंडळाचे सदस्य श्री.तेजरामजी नाखले  यांच्या हस्ते सकाळी ७.३० वाजता ध्वजारोहण झाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्हे

तसेच रेखडे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री.वा.पा. देवते, श्री.भाऊरावजी सुपले, व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये बिस्किटचे वाटप करण्यात आले.




**आठवडी शिबिर**

**रविवार दि. ३ फेब्रुवारी २०१९**

रविवार दि. ३ फेब्रुवारी २०१९ आठवडी शिबिराचा शेवट असल्यामुळे रा.से.यो. विभागातर्फे महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदान करून वार्षिक रा.से.यो. शिबिराची सांगता करण्यात आली. महाविद्यालयाचे डॉ. प्रमोद वडते यांनी स्वयंसेवकांनी वर्षभरात केलेल्या कामाची प्रशंसा केली. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी शिस्तबध्द राहून अतिशय योग्यरित्या काम केल्याबद्दल कौतुक केले.

या प्रसंगी उपस्थित असलेले डॉ. खापरे, डॉ. ठवळे, डॉ.वडते, डॉ. जाचक, डॉ. देवते, प्रा. भालेराव, डॉ. थोडगे. प्रा.काळे, प्रा.कु. गहुकर, श्री.संजय गणोरकर, प्रदीप बगडे हरिष अंजनकर यांचे रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी आभार मानले.




**लोकशाही पंधरवाडा - मतदार जागृती**
**दि. ११.०२.२०१९**

मोहपा एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात मतदान जनजागृती मोहिमेंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

लोकशाहीवर निष्ठा ठेऊन सुशासनाची निर्मिती करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावण्याकरिता मतदान करण्याची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. सोबतच मतदात्याला जागृत करण्यासाठी मतदार जागृती रॅलीचे आयोजनही करण्यात आले. महाविद्यालयातून निघालेल्या या रॅलीत मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. प्राध्यापकांनी मतदान जागृतीबाबत विविध घोषणा देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत जास्तीत मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. घोषवाक्यांचे फलक हाती घेऊन, विविध लक्षवेधी घोषणा देत ही रॅली गावातून मुख्य रस्त्यांवरून नेण्यात आली. महाविद्यालयात या रॅलीचा समारोप झाला.

महाविद्यालयातील जे विद्यार्थी नव्याने मतदार होणे अपेक्षित आहे, अशा विद्यार्थ्यांकडून मतदार ओळखपत्र भरून घेण्यात आले. सोबतच लोकशाही पंधरवाड्यानिमित्त महाविद्यालयात व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. यातून विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांनाही लोकशाही व्यवस्थेशी परिचित करावे, यासाठी प्रयत्न व नियोजन करण्यात आले.

हे सर्व उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मा. वि. कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्षतेखाली राबविण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. लीलाधर खरपुरिये यांचेसह डॉ. अश्विनी खापरे, प्रा. डॉ. संजय ठवळे, डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजीत जाचक, डॉ. विनोद भालेराव, डॉ. धनंजय देवते, डॉ. अल्का थोडगे, प्रा. कु. सविधा गहुकर आणि प्रा. सचिन काळे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.

पंधरवाड्याच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकेतर कर्मचारी संजय गणोरकर, शुभम वाघ, चैतन्य सुपले यांचेसह रजनी गणोरकर, प्रदीप बगडे आणि प्रकाश कोकोडे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमात सर्व रा. से. यो. स्वयंसेवक उपस्थित होते.





डॉ. लिलाधर डी. खरपुरिये — डॉ. एम. व्ही. कोल्हे

रा. से. यो कार्यक्रम अधिकारी — प्राचार्य

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा